महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० मध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : स्थांसक – २०१५/प्र.क्र. ४७/२०१५ नवि-३२
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दि. ३१ जुलै, २०१५

**शासन निर्णय** :- सोबतची शासकीय अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग यामध्ये मराठी व नंतर इंग्रजी अशा रितीने दि. १ ऑगस्ट, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

दि. ३१.०७.१५

( गो. आ. लोखंडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. व्यवस्थापक, शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४ त्यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णयाप्रमाणे अधिसुचना शासनाच्या असाधारण राजपत्रात भाग-एक-अ. उपविभागामध्ये प्रसिध्द करून त्याच्या प्रती खालील सर्व संबंधितांना पाठवाव्यात आणि १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.
२. सर्व आयुक्त, महानगरपालिका (प्रत्येकी ५० प्रती)
३. निवड नस्ती नवि-३२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

Received
3/8/15

# अधिसूचना

नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२
दि. १ ऑगस्ट, २०१५.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

क्रमांक. स्थासंक-२०१५/प्र.क्र. ४७/२०१५ नवि-३२. - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम १५२ न च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन या द्वारे पुढील नियम, सदर नियमास १५२ न च्या पोट कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दी देवून करीत आहे, ते असे :-

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम २०१० च्या नियम, ३ मधील उप नियम (१) यामध्ये खालील मजकुर दाखल करण्यात येत आहे.

" ज्या व्यापा-यांची दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये खरेदी अथवा विक्रीची उलाढाल वर्षामध्ये ५० कोटी पेक्षा कमी नसल्यास स्थानिक संस्था करासाठी नोंदणी करणे आवश्यक राहील.

३. नियम १७ मध्ये उपनियम (१) मध्ये, खंड (ख) च्या ऐवजी खालील खंड दाखल करण्यात येत आहे,

(ख) " ज्या व्यापाऱ्यांच्या खरेदी किंवा विक्रीची उलाढाल दिनांक १ एप्रिल,२०१५ रोजी सुरू होणा-या आर्थिक वर्षा पूर्वीच्या आर्थिक वर्षामध्ये रुपये ५० कोटी पेक्षा कमी असेल अशा व्यापा-याचा नोंदणी दाखला दिनांक १ ऑगस्ट २०१५ रोजी रद्द झाला असे समजण्यात येईल. "

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**गो. आ. लोखंडे**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

# NOTIFICATION

**Urban Development Department,**
Hutatma Rajguru Chowk,
Madam Cama Marg,
Mantralaya, Mumbai – 400 032
Date - 1st August , 2015.

**Maharashtra Municipal Corporations Act,**

No. LBT- 2015/CR-47/UD-32. – In exercise of the powers conferred by su section (1) of section 152T of the Bombay Provincial Municipal Corporation Ac 1949 (Bom.LXI of 1949) and of all other powers enabling it in that behalf, tl Government of Maharashtra, hereby makes the following rules, the same having be previously published as required by sub section (2) of the said section 152T namely:

1. These rules may be called the Maharashtra Municipal Corporations (Local Bo Tax) (Amendment) Rules, 2015.

2. In rule 3 of the Maharashtra Municipal Corporations (local body tax) Rules,20 (hereinafter referred to as "the Principal Rules") in sub-rule (1) the following shall added, namely :-

" Provided that for any period starting on or after 1st April 2015, the dea whose turnover of sales or turnover of purchases, during any year, is not less than cr, shall only be liable for registration."

3. In Rule 17 of the Principal Rules in sub-rule (1), for clause (b), t following sub clause shall be substituted namely:-

(b) "neither the turnover of sales nor the turnover of purchases of a registered deal during the year prior to the year starting on 1st April 2015 has exceeded rupees 50 then, the certificate of registration of such dealers shall be deemed to have be cancelled with effect from 1st August 2015".

**By Order and in name of the Governor Of Maharashtra,**

**G. A. Lokhande,**
Deputy Secretary to Government